**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – समीर दशरथ पारदे.

**वय** – ४२ वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार** – मलिग्रे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.**

**१.** माझे बारावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मी या खटल्यातील सर्व आरोपी माझ्या गावातील असल्यामुळे त्यांना ओळखतो. आमच्या गावामध्ये सन १९७० पासून रवळनाथ दूध संकलन संस्था आहे. आरोपी क्र.१ हा त्या संस्थेमध्ये सन २०१५ पुर्वी सचिव होता. त्याच्या निवृत्तीनंतर आरोपी क्र.११ हा सन २०१५ पासून आजपर्यंत सचिव आहे. इतर सर्व आरोपी हे त्या संस्थेचे आजी– माजी संचालक आहेत.

**२.** सन २०१५ साली संस्थेची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ स्थापन झाले होते. त्यानंतर सन २०१६ साली सभासदांना संस्थेचे सचिव हे संचालकांना विश्वासात न घेता कारभार करत असून हात शिल्लक रकमेतून गैरव्यवहार करत असल्याची शंका आली होती. त्यामुळे जून २०१६ साली आम्ही संस्थेच्या २०१२ ते २०१६ पर्यंतचे पुर्नलेखापरीक्षण होण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव घेऊन लेखा निबंधकांकडे मागणी केली होती.

**३.** आमच्या मागणीप्रमाणे शासकीय लेखापाल व्ही. बी. पाटील यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी सन २०११–१२ ते २०१६–१७ च्या कालावधीचे लेखापरीक्षण केले होते. त्या तपासणीमध्ये आरोपी क्र.१ सचिव असलेल्या कालावधीत त्याने भ्रष्टाचार केल्याचे निष्पन्न झाले होते. लेखापरीक्षकांनी २०१५ नंतरच्या कालावधीचे केलेल्या लेखापरीक्षणामध्ये आरोपी क्र.११ ने हात शिल्लक रकमेत भ्रष्टाचार केल्याचे निष्पन्न झाले होते. त्या तपासणीमध्ये १०,५०,०८०/– रुपयांचा अपहार झाल्याचे सिध्द झाले होते. त्यामुळे लेखापरीक्षकांनी त्याबाबत तक्रार दिली होती. पोलिसांनी त्याबाबत माझ्याकडे चौकशी केली होती. आज आरोपी क्र.१४, १५, १८ आणि २२ न्यायालयात हजर नाहीत. आरोपी क्र.१७ मयत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपी क्र.१ ते ११ करीता उलटतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.</u>**

४. आरोपीच्या वकिलांनी दिलेल्या नि. क्र.८८ वरील अर्जावरुन उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.

**उलट तपास अपुर्ण.**

**<u>आरोपी क्र.१२ ते २२ करीता उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.</u>**

५. मी कधीही रवळनाथ दूध संकलन संस्थेत संचालक नव्हतो. आम्ही केलेली तक्रार सन २०१५ चे नवीन संचालक मंडळ स्थापन होण्यापूर्वीच्या कारभारा बाबत केली होती. संस्थेचा संपुर्ण कारभार सचिवां मार्फत होत होता. संस्थेचे सर्व आर्थिक व्यवहार सचिव पाहत होते. आरोपी क्र.१२ ते २२ यांच्याकडे संस्थेचा कोणताही आर्थिक व्यवहार नव्हता.

**उलट तपास पुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ३०.०९.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.